*Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's*
**C. K. THAKUR VIDYALAYA, NEW PANVEL**
ENGLISH MEDIUM - SECONDARY SECTION
Plot: 8, Sector: 14, Janardan Bhagat Marg CIDCO Colony, New Panvel, TN: 27463729, E-mail: ckteshm@gmail.com
School Code / Index: (1) HSE & NTSE: **1403039**; (2) U-DISE: **27240818843**; (3) SSC: **17.01.017**

**id.16.07.2025**

# ''सीकेटीत इन्वेस्टिचर (Investiture Ceremony) समारंभ दिमाखात साजरा'

सी के टी इंग्रजी माध्यम नवीन पनवेल विद्यालयात इन्वेस्टीचर समारोह शिस्तबद्ध पद्धतीने साजरे करण्यात आला. बुधवार दिनांक १६ जुलै २०२५ रोजी सीकेटी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या ''**इन्वेस्टीचर समारोह**'' अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यालयात असलेल्या ब्ल्यू, ग्रीन, रेड व यल्लो हाऊसचे कप्तान, उपकप्तान, मंत्री तसेच स्वयंसेवक यांना मान्यवरांच्या हस्ते बॅचेस व स्कार्फचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. योगेश पाटील नॅशनल बॅडमिंटन कोच (NIS) उपस्थित होते. आजच्या युगात अभ्यासाबरोबरच खेळालाही महत्त्व देणे गरजेचे आहे. ज्ञानदाना बरोबरच खेळालाही प्राधान्य मिळायला हवे. या हेतूनेच आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सीकेटी इंग्रजी माध्यमातील इ. १० वी चा विद्यार्थी स्वस्तिक भोसले याला २०२५–२६ चा हेल्थ ॲण्ड वेल्थ दूत (ॲम्बॅसिडर) म्हणून घोषित करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी चांगल्या आरोग्यासाठी खेळाचा जीवनात समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे सकारात्मक वृत्ती बरोबरच नम्रता येते. खिलाडीवृत्ती मुळे पराभव पचविण्याची ताकद वाढीस लागते. खेळामुळे एकता आणि सहकार्याची भावना विकसित होते. कोणत्याही संकटाचा सामना करण्यात येतो असे यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण सर यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सौ. मनिषा नारखेडे यांनी तसेच कार्यक्रमाचे आभार देखील मानले

सदर कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष चव्हाण सर विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ नीरजा अदुरी मॅडम, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ नीलिमा शिंदे, सौ वैशाली पारधी तसेच पालक संघ व इतर मान्यवर उपस्थित होते.